# जलसाक्षरता ही काळाची गरज - डॉ. चिंतामणी देवकर

कृषी विज्ञान केंद्र धुळे यांच्या वतीने "जागतिक जल दिन" २२ मार्च रोजी ऑनलाइन पद्धतीने साजरा करण्यात आला . जागतिक जल दिनाचे औचित्य साधून "सिंचनाच्या पाण्याचे मूल्यमापन आणि व्यवस्थापन" या विषया वर एक दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ . चिंतामणी देवकर सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालय धुळे यांनी भूषविले . डॉ. दिनेश नांद्रे कार्यक्रम समन्वयक , कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. अतिश पाटील मृदा शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षणीय भाषणात डॉ. चिंतामणी देवकर सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय धुळे यांनी कृषी क्षेत्रातील सिंचनाच्या पाण्याच्या गुणवत्तेला असलेले महत्त्व स्पष्ट केले. पाण्याच्या अवास्तव आणि अतिरेकी वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिघडत चालले आहे . पिकांच्या गरजेपेक्षा जास्त पाण्याचा पुरवठा केल्यामुळे जमिनीचे अतोनात नुकसान होत आहे . त्यामुळे चांगल्या जमिनीचे रूपांतर क्षारपड जमिनीमध्ये होत आहे , अशी चिंता देखील त्यांनी व्यक्त केली. जमिनीचे संवर्धन करण्यासाठी सिंचनाच्या पाण्याचे परीक्षण करणे आणि आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर शेतकऱ्यांनी करणे ही आता काळाची गरज बनली आहे असं डॉ . चिंतामणी देवकर म्हणाले.

डॉ. दिनेश नांद्रे कार्यक्रम समन्वयक , कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणामद्धे कृषि विज्ञान केंद्र धुळे येथील प्रयोगशाळेत सिंचनाच्या पाण्याच्या गुणवत्ता तपासणी संबंधित माहिती दिली. सिंचनाच्या पाण्याच्या गुणवत्तेवर जमिनीची उत्पादन क्षमता अवलंबून असते. क्षारयुक्त पाण्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता कमी होते. त्यासाठी आधुनिक लागवड पद्धत्तींचा अवलंब शेतकर्यांपनी करायला हवा असे आवाहन डॉ. दिनेश नांद्रे यांनी यावेळी केले.

डॉ. अतिश पाटील मृदा शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी सिंचनाच्या पाण्याचे मूल्यमापन आणि व्यवस्थापन , क्षारपड जमिनी पूर्वपदी आणण्यासाठी करावयाच्या एकात्मिक उपाययोजना या विषयावर सविस्तर मार्गदर्शन उपस्थित प्रशिक्षणार्थींना केले. पावसाळ्यात भूपृष्ठावरून वाहून जाणार्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करायला हवे. विहीर आणि कूपनलिका

पुनर्भरण तंत्रज्ञानाचा वापर करून भूजलसाठा पूर्ववत करायला पाहिजे असे मत डॉ. अतिश पाटील यांनी त्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानात मांडले.

डॉ. धनराज चौधरी श्यास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. पंकज पाटील श्यास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र धुळे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यामध्ये श्री रोहित कडू , श्री जगदीश कथेपुरी, श्रीमती अमृता राऊत , श्री जयराम गावीत, श्रीमती प्राची काळे , स्वप्नील महाजन, बाळू वाघ, रमेश शिंदे, यशवंत मासुळे आणि जीवन राणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.




**जागतिक जल दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. चिंतामणी देवकर**